प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (प.) कार्यालयाकरिता वर्सोवा,ता.अंधेरी येथील सर्वे क्र.८३ अे,न.भु.क्र.३/१/१ या ठिकाणी वाहनांची योग्यता प्रमाणपत्र तपासणीअंतर्गत ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-१११७/प्र.क्र. २९७ /परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ३० नोव्हेंबर २०१७

वाचा :

१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.२८/२०१३ (श्री.श्रीकांत कर्वे विरुध्द महाराष्ट शासन) मध्ये दि.१८.०२.२०१६ रोजी दिलेले आदेश.

२) महसूल व वन विभाग अधिसूचना क्र.जमीन-२०१५/प्र.क्र.५५/ज-१, दि.३१.१२.२०१५.

प्रस्तावना :

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.२८/१०१३ मध्ये वाहनाची योग्यता प्रमाणपत्र तपासणीसाठी परिवहन कार्यालयांजवळ २५० मी. X ६ मी. लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्याचे दि.१८.०२.२०१६ रोजी आदेश दिले आहेत. त्यानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंधेरी (प.) कार्यालयाकरिता ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.१८.०२.२०१६ च्या आदेशानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंधेरी (प.) कार्यालयाकरिता मौजे वर्सोवा, ता.अंधेरी येथील सर्वे क्र.८३ अे, न.भू.क्र.३/१/१ मिळकतीमधील मागणी केलेले क्षेत्र अंदाजे १६००० चौ.मी. पैकी सिमेट्री व डी.पी.रोडचे क्षेत्र वगळून ११,५७२ चौ.मी.क्षेत्र इतक्या जागेवर वाहनाची योग्यता प्रमाणपत्र तपासणी अंतर्गत ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम,१९७१ च्या नियम ६ (३) मधील नमूद तरतूदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन सुधारित प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे सादर करुन त्यांच्याकडून महसूलमुक्त व सारामाफ जमीन प्रदानाचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत.

सदर जमिनीचा ताबा परिवहन कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यासंदर्भात आवश्यक असणा-या खर्चास मान्यता मिळण्याकरिता सा.बां.वि.कडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन वित्तीय मान्यतेकरिता शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११३०१२३८४२६२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df749270342 8e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.11.30 12:40:56 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, गृह (परिवहन)विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल, यांचे खाजगी सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा)/ (लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
६. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. परिवहन उप आयुक्त (प्रशासन / लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (प.)
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.उप सचिव महसूल विभाग/नियोजन विभाग/वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
१३.निवड नस्ती, परि-४